# <u>सक्षिंप्त फौ. ख. नं.८९०५/२०२३</u>

## निशाणी १ वरील आदेश

फिर्याद, त्या सोबतची सर्व कागदपत्र तसेच फिर्यादीचे शपथपत्र यांचे अवलोकन केले. फिर्यादीतर्फे विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

२. प्रस्तुत प्रकरणातील आरोपी हा सदरहू न्यायालयाच्या अधिकार क्षेत्राच्या बाहेर राहणारा आहे. पंरतू फिर्यादी मार्फत परक्राम्य लेख अधिनियम १८८१ चे कलम १३८ (Negotiable Instruments Act, 1881) अन्वये संपुर्ण पुर्तता करण्यात आलेली आहे. **त्यामुळे व प्रस्तुत गुन्हाचे तात्रींक स्वरुप पाहता फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २०२ अन्वये अपेक्षित असलेली चौकशी, आवश्यक नसल्याचे मतास मी आलेलो आहे.**

३. आरोपीविरुध्द प्रस्तुतची केस चालविणेसंबंधी प्रथमदर्शनी केस असल्याचे दर्शविलेले आहे. त्यामुळे प्रस्तुत केसमधील आरोपीस परक्राम्य लेख अधिनियम १८८१ चे कलम १३८ अन्वयेच्या अपराधाबद्दल समन्स काढण्यात यावे.

४. फिर्यादीने प्रोसेस व इतर संबंधीत बाबींची पूर्तता करावी. समन्स परतीचा पुढील दिनांक / /२०२४ नेमणेत आला आहे.

५. मा.सर्वोच्च न्यायालय यांनी ***दामोदर एस. प्रभू विरुध्द सययद बाबालाल***, ए.आय.आर.२०१० सुप्रिम कोर्ट १९०७ या न्याय निर्णयामध्ये दिलेल्या मार्गदर्शक तत्तवानुसार आरोपी विरुध्द समन्स पाठविण्यांत यावे.

IRSHAD MOHMADRAFIK NAIKWADI
Digitally signed by IRSHAD MOHMADRAFIK NAIKWADI
DN: cn=IRSHAD MOHMADRAFIK NAIKWADI, ou=BOMBAY HIGH COURT,CID - 6951374, o=BOMBAY HIGH COURT, st=Maharashtra, c=IN
Date: 2024.07.12 15:40:18 +0530

दिनांक – १२/०७/२०२४
अहमदनगर

**(ई.मो.नाईकवाडी)**
अति.मुख्य न्यायदंडाधिकारी
(न्यायालय क्र.०७), अहमदनगर.